ISSN 2231-1629
Knowledge Resonance
● Vol-9 No. 2 ● July-December 2020

# कोविड–19 चा भारतीय अर्थव्यवस्थेवर होणारा परिणाम

**डॉ. डी.डी.सांबारे**
ग्रंथपाल,
प्रिन्सीपल अरूणराव कलोडे महा., नागपूर

**प्रा. पंढरी जी.मोरे**
सहा. प्राध्यापक (अर्थशास्त्र)
प्रिन्सीपल अरूणराव कलोडे महा., नागपूर

**प्रस्तावना :–**

संपूर्ण देशाच्या इतिहासात साथीच्या रोगाची परंपरा आपल्याला आढळून येते. इ.स.1720 मध्ये प्लेगच्या रोगाची साथ संपूर्ण जगभर पसरलेली होती. आणि त्या साथीच्या रोगात लक्षावधी लोकांचा मृत्यू झाला होता.आणि त्या रोगाला 'मार्सिलेचा प्लेग'किंवा 'बुबोनिक प्लेग'या नावाने ओळखला जातो. त्याच काळात लोकसंख्येच्या 20 टक्के जनता यात मरण पावल्याची नोंद आहे.तसेच या रोगाचा सर्वात जास्त प्रभाव पर्शिया, इजिप्तमध्ये सर्वाधिक होता.त्याचबरोबर भारतातही प्लेगचा प्रादूर्भाव 19व्या शतकाच्या अखेर झालेला आहे.

त्यानंतर इ.स.1820 मध्ये 'द फर्स्ट कॉलरा' हा रोग भूतलावर आढळला. मात्र या महामारीचा प्रारंभ थायलंड, इंडोनेशिया, फिलिपाइन्स इत्यादी भागात मोठ्या प्रमाणात सुरू झाली. या दोन प्रकारच्या महामारी नंतर 1920 मध्ये जागतीक स्तरावर 'स्पनिश लू' या संक्रमक रोगाचा प्रादुर्भाव जागतीक स्तरावर सुमारे 1/3 लोकसंख्या यात बळी पडली.या रातगाचा विषाणू सर्वप्रथम युरोप, युनायटेड स्टेटस् आणि आशिया खंडामध्ये मोठ्या प्रमाणात पसरला. सुमारे यात 2 कोटी लोक भारतातील मरण पावले.

इ.स. 2020 मध्ये हे महामारीचे संकट 'कोरोना उर्फ कोविड–19'या नावाने संपूर्ण जगभर थैमान घातलेला दिसून येते. आजच्या महामारीचा जो व्हायरस आहे त्याचे श्रेय चीनकडेच जाते. वूहान येथील प्रयोगशाळेत डॉ. तासूक होल्गो या जापानी शास्त्रज्ञाने गेल्या चार वर्षापासून संशोधनाचे काम केले.त्या शास्त्रज्ञाचे असे म्हणणे आहे.की,जगात सध्या थैमान घालीत असलेला 'कोरोना व्हायरस पॅडेमिक अर्थात कोविड–19 या महामारीच्या मागे चीन या देशात होत आहे. त्यांच्यामते कोरोना हा विषाणू नैसर्गिक नाही कारण हा विषाणू नैसर्गिक असता तर संपूर्ण जगभर थैमान पसरला नसता त्याचे कारण म्हणजे प्रत्येक देशाचे वेगवेगळे तापमान व हवामान आहे.त्यामुळे चीनशी जुळणाऱ्या तापमान असलेल्या देशातच त्याची लागण झाली असती परंतु हा व्हायरस स्वित्झर्लंडसारखा थंड प्रदेशापासून तर वाळवंटी प्रदेशापर्यंत पसरला आहे. याचा अर्थ असा की हा व्हायरस मानवनिर्मित आहे.आणि तो चीनमध्ये निर्माण केलेला आहे.

कोरोना विषाणूने (कोविड–19) संपूर्ण जगाला हादरवलेले दिसून येते. अनेक आर्थिक व्यवहार ठप्प झाल्यामुळे जगातील विविधा देशांच्या अर्थव्यवस्था कोलमडल्या असल्याचे निदर्शनास येते. कोरोना विषाणूचा प्रादूर्भाव होण्याअगोदर भारतीय अर्थव्यवस्था फार भक्कम स्थितीत होती असे नाही तर कोरोनामुळे उद्योग धंद्याला टाळ लागल्या नंतर देशाची अर्थव्यवस्था अधिकच कोलमडली आणि याचा परिणाम दिर्घकाळापर्यंत अर्थव्यवस्थेवर होईल. आर्थिक वर्षातल्या पुढील दोन–तीन महीन्यात पर्यंत अर्थव्यवस्थेची कोणतीही घडी बसण्याची चिन्ह नाहीत, मात्र टाळेबंदीच्या पहिल्या तीन आठवड्यामध्ये देशाच्या सकल राष्ट्रीय उत्पन्नाचे आठ ट्रिलियन डॉलर्सचे नुकसान झाल्याचा अंदाज वर्तविण्यात येत असल्याचे दिसून येते. 2020–21 या आर्थिक वर्षात भारतीय अर्थव्यवस्थेच्या वाढीचा वेग 1.9 टक्के असेल असं आंतर्राष्टीय नाणे निधीने म्हटले आहे. तोच जागतिक बॅकेचा अनुमान या पेक्षाही कमी आहे.जागतिक बॅकेच्या अहवालानुसार भारतीय अर्थव्यवस्था वाढीचा वेग फक्त 1.5 टक्के एवढा राहील असा अनुमान दर्शविलेला आहे. आणि या कोविड–19 च्या विषाणूमुळे भारतीय अर्थव्यवस्थेवर कोणते परिणाम दिसून येतात याचा विचार पुढील प्रमाणे करता येईल.

**भारतीय शेतीवर होणारा परिणामः–**

कोरोनाच्या प्रादूर्भावा अगोदर भारतीय कृषी अर्थव्यवस्था ही अन्नधान्याच्या किमतीच्या बाबत लक्षणीय वाढ अनुभवत हीती. मात्र कोरोनाच्या प्रादूर्भावानंतर भारतीय कृषी अर्थव्यवस्था ही अन्न धान्याच्या किंमती बाबत घसरण न होता त्यांच्या किंमतीत वाढ होत असतांना दिसून येते. जानेवारी 2020पर्यंत हा दर 2013–14 ला असणाऱ्या उच्चांका एवढा गेलेला होता. कोविड–19 विषाणू महामारीच्या संकटामुळे एकूणच घट झाल्याने अन्नधान्य चलनवाढीचा दबाब कमी होईल असे मुल्यांकन आरबी आयनी केले. अनेक कारणामुळे गहू, द्राक्षे, तांदूळ, टरबूज, केळी, मेथी, चणा, कापूस, मिरची, हळद, जिरे, कोथिंबीर, कांदा आणि बटाटे अशा शेती पिकांची खरेदी–विक्री करणाऱ्यासमोर अनेक

प्रश्न निर्माण झाले. त्याच बरोबर शेतमालाच्या किंमती कमी झाल्या होत्या. कोरोनाच्या प्रादूर्भावामुळे शेतकऱ्यांना एकदाही पिक घेता आले नाही किंवा पीक आपल्या शेतातच सोडून द्यायची वेळ त्यांच्यावर आलेली होती.याच काळात मागणी घटल्याने द्राक्ष उत्पादकांना महामारीच्या संकटामुळे जवळपास 1000 कोटी रूपयाचा शेतमालाच्या तोटा सहन करावा लागला. आता मात्र या वस्तूंचे भाव वाढल्याने त्या वाढत्या किंमतीचा लाभ शेतकऱ्यांना न मिळता आहे. पोल्ट्री व्यवसायाचा समावेश जीवनाश्यक गोष्टी मध्ये केला गेला असूनही शेतकरी घाबरून जाऊन अत्यंत कमी किंमतीत त्यांची विक्रि करीत आहेत.

### ग्रामीण व्यावसायिकांवर होणारा परिणामः—

स्वातंत्र्य प्राप्तीनंतर भारतातील ग्रामीण अर्थव्यवस्था मुख्यतः बारा बलुतेदारांवर अवलंबून होती.मात्र नंतरच्या काळा मध्ये ही व्यवस्था हळूहळू लोप पावत असतांना दिसते. भारतात अजूनही काही परंपरागत व्यवसाय सुरू आहे. आणि काळा नुरूप त्यामध्ये बदल होत आहे. ग्रामीण भागात आधुनिक साधनाचा वापर वाढीस असतांना दिसून येते. त्यानुसार पुरक व्यवसायही सुरू झाले. आणि त्याव्दारे रोजगाार निर्मितीला मोठ्याा प्रमाणात चालना मिळाली. दुसराकडे ग्रामीण भागातून शहरी भागाकडे रोजगारासाठी जाणाऱ्याचा ओढ असतांना दिसून येते. आणि स्थलांतरामुळे शहरातील लोक संख्येची दाटी वाढू लागली आहे. त्याच बरोबर शहरामध्ये औद्योगिक विकासाला मोठ्याा प्रमाणात व्यवसायाला चालना दिली जात असल्यामुळे तसेच बांधकाम व्यवसाय मोठ्याा प्रमाणात होत असल्याने रोजगाराच्या व्यापक संधी निर्माण होत राहिल्या आहे. खऱ्या अर्थाने 'भारत हा खेड्यांचा देश आहे. आणि ग्रामीण विकासातच देशाचा विकास समावलेला आहे. असं कितीही म्हटल जात असल तरी प्रत्यक्षात तशी पावल टाकली गेली नाहीत. परिणामी संपूर्ण ग्रामीण विकासाच स्वप्न अजूनही प्रत्यक्षात आलेलं नाही. त्यातच शेती व्यवसाय दिवसेंदिवस अडचणीत येत चालल्यान अनेक जण शेती सोडून अन्य व्यवसायाकडे वळू लागले, शेतकऱ्यांच्या आत्महत्यांच्या घटना मध्ये वाढ झाली. या पार्श्वभूमीवर कोरोनाच संकट उभ राहील, या संकटाचे देशाच्या अर्थकारणावर त्याचा गंभीर परिणाम झालेला दिसून येतो. त्याचप्रमाणे ग्रामीण अर्थकारणावर ही याचा गंभीर परिणाम झाला. सावकाराकडून कर्ज घेण्याशिवाय पर्याय उरला नाही. त्यामुळे खासगी सावकारीला पुन्हा चालना मिळाली,

### लघु उद्योगावर होणारा परिणाम :—

कोविड—19 विषाणूचा प्रादूर्भाव लघु उद्योगावर मोठ्या प्रमाणात झालेला दिसून येतो. लद्यु उद्योगाचे संपूर्ण व्यवहार या लॉक डाऊनच्या काळात बंद झालेले आहे. विशेषतः उद्योग जगतासाठी ही आवश्यक बाब आहे, की आज जर आपली आर्थिक स्थिती पूर्ववत आणण्यासाठी औद्योगिक उत्पादन सुरू करणे आवश्यक आहे.उत्पादन केल्या शिवाय ते वाढणार नाही.व ते वाढवायचे असेल, तर त्यासाठी आवश्यक असलेल्या सर्व सेवा उपलब्ध करून देणे महत्वाचे आहे. आज एम एस एमई क्षेत्रासाठी बऱ्याचशा गोष्टी उपलब्ध करून देण्यात येत आहे. त्यामुळे अशा उद्योगाला आर्थिक कुशन मिळाले आहे.तसेच त्याचे उत्पादन वाढविण्यासाठी बाजारपेठ उपलब्ध असणे आवश्यक आहे. ती बाजारपेठ समाजाला सतत लॉक डाऊन मध्ये घरांमध्ये बंदिस्त ठेवत आहे. त्यामुळे अशा उद्योगाला विशेष वाव मिळत आहे. कोरोनाच्या प्रादूर्भावामुळे लघुउद्योगाच्या उत्पादनात घट झालेली आहे. त्यामुळे लद्यु उद्योगातील संघटकांला आपल्या उद्योगातून श्रमिकांचे प्रमाण कमी करावे लागत आहे. कारण संघटकाला लघु उद्योगाच्या मालापासून प्राप्त होणारे उत्पादन कमी व खर्च जास्त होत असल्याने त्यांना नुकसान सहन करावे लागत आहे,आणि विशेषकरून या उद्योगामार्फत मिळालेल्या उत्पादनाची विक्रि करण्यासाठी बाजारपेठ विषाणूच्या प्रादूर्भावामुळे प्राप्त होऊ शकत नाही.

### गुंतवणूकीवर होणारा परिणाम :—

कोरोना विषाणूच्या पार्श्वभूमीवर प्रत्येकालाच गुंतवणूकीची चिंता भेडसावत आहे. मालमत्ता उद्योगाचं काय होणार यासारखे प्रश्न निर्माण होत आहे. शेयर बाजार, म्युच्युअल फंडस्च्या कामगिरीकडेही गुंतवणूक दारांचे लक्ष केंद्रित होत आहे. मालमत्ता क्षेत्राबद्दल बोलायच म्हटल तर गेल्या काही वर्षापासून या बाजारपेठेत मंदी होती. नोटाबंदी, जीएसटी सारख्या निर्णयांमुळे हे क्षेत्र भरडल गेल, याच काळात बांधकाम व्यावसायिकाची परिस्थिती बिकट झालेली आहे.अशा अनेक प्रकारच्या कारणाने बाजारात फारसा उठाव नसतांनाही मालमत्तेच्या किमतीवर विपरित परिणाम झााला कोरोना विषाणूमुळे मालमत्तेच्या किंमतीमध्ये आधीच घट झाली असतांना गुंतवणूकीचं मुल्य कमी होण्याचा फारसा धोका उरलेला नाही.अर्थात सगळीच परिस्थिती नकारात्मक नाही. UNCTAD च्या अहवाला नुसार भारत आणि चीनच्या अर्थ व्यवस्थांना कोरोनामुळे उद्‌भवलेल्या आर्थिक मंदीचा फार फटका बसणार नसल्याचं नमूद करण्यात आले आहे. गुंतवणूकीच्या पारंपारिक पर्यायांच्या तुलनेत म्युच्युअल फंड अधिक परतावा देत असल्यामुळे दीर्घकालीन आर्थिक उद्दिष्टांसाठी या पर्यायां मध्ये गुंतवणूक करणाऱ्यांची संख्या बरीच जास्त आहे.मात्र सद्या शेअर बाजारातल्या घसरणीमुळे म्युच्युअल फंडामधला गुंतवणूकदार धास्तवला आहे. कोरोना विषाणू आर्थिक मंदी आणि आळेबंदी अशा परिस्थितीत नेमके काय करायचे असा

प्रश्न गुंतवणूक दारासमोर निर्माण होत आहे.एक गुंवणूकदार म्हणून दिर्घकालीन आर्थिक उद्विष्टांना समोर जाणे आवश्यक ठरते. आर्थिक उद्विष्ट साध्य करण्याच्या दृष्टीने अनेकजण आपत्कालीन निधीच्या तरतूदीला जास्त महत्व देत नाहीत,त्यासाठी साधारणता सहा महीने ते वर्ष भराच्या काळाचा आपत्कालीन निधी असणे आवश्यक ठरते.यासाठी लिक्विड फंडामध्ये पैसे गुंतविता येईल,टर्म विमा पॉलीसी याचा अर्थ नियोजनाचा पहिला टप्पा आहे. आणि आपत्कालीन निधीची तरतूद हा आर्थिक दृष्ट्याा स्वावलंबी होझयाचा दुसरा टप्पा आहेअसे म्हणता येईल. म्हणून आपल्या दिर्घकालीन आर्थिक उद्विष्टांसाठी गुंतवणुक करावी.असे केले तर कोणत्याही आर्थिक संकटाचा फटका गुंतवणूकदारावर बसणार नाही.

**बहुराष्ट्रीय कंपन्यावरील परिणाम :–**

कोविड–19 विषाणूचा परिणाम मोठ्याा प्रमाणात बहुराष्ट्रीय कंपन्यावर झालेला दिसून येतो.कारण बहु राष्ट्रीय कंपन्याच्या उत्पन्नात बदल झालेला दिसून येतो.या प्रादूर्भावामुळे या कंपन्यांना मिळणारे उत्पन्न कमी आणि खर्च जास्त प्रमाणात होऊ लागला. त्याच बरोबर या कंपन्याचे उत्पन्न पूर्णतः बंद झाले. त्यामुळे या बहु राष्ट्रीय कंपन्याना फार मोठा तोटा सहन करावा लागत आहे. या सर्व कारणमुळे बहु राष्ट्रीय कंपन्यानी त्यांच्या पगारामध्ये कपात केली जात आहे. त्यामुळे या कंपन्यांना मिळणारे उत्पन्न आणि खर्च याचा विचार करून प्रत्येक कंपन्या श्रमिकांना कामावर घेत आहे.या कोरोना प्रादूर्भावाचा सर्वात अधिक परिणाम बहु राष्ट्रीय कंपन्यावर पडत असतांना दिसून येते.

**क्रिडा क्षेत्रावर होणारा परिणाम :–**

कोरोना हा संसर्ग जन्य आजार आणि त्यानंतर ठप्प झालेले व्यवहार यांचाही फटका क्रिडा क्षेत्रावर झालेला दिसून येतो. गेल्या काही महिन्या पासून मैदान ओस पडलेले दिसून येत आहे. मैदानावर जीवतोडून खेळणारे खेडाळू आणि या या खेळाडूंच्या समर्थनार्थ जमलेले प्रक्षेक हे चित्र दिसत नव्हते, कुठेही गोंधळ, गडबड नव्हती, चाहत्यांना नविन उर्जा देणारे क्षेत्र पूर्णतः स्तब्ध होत. मात्र आता विविध देशामधील संचार बंदी उठत आहे. लॉक डाऊनचे नविन नियम शितील होत आहे.आता कदाचित पुढची काही वर्ष तरी आयुष्य पुर्वी सारखी नसतील, त्याच प्रमाणे कोरोना प्रादूर्भावाचा क्रिडा क्षेत्रावर परिणाम होऊन त्यात बद्वल झालेले आहेत. त्याच बरोबर खेळाचे नियम बदलू शकतात. पुढचा काही काळ तरी प्रक्षकाविनाच सामने खेळण्याची सवय खेळाडूना लावून घ्यावी लागणार आहे. कोरोनामुळे झालेल्या नुकसान भरपाईसाठी क्रिकेट सह विविध खेळाच्या संघटनांनी खेळाडूंच्या मानधनात कपात करण्याचा निर्णय घेतला आहे. या कोरोनाच्या प्रादूर्भावामुळे गेल्या तीन महिण्यापासून कोणत्याही क्रिडा संघटना, स्पर्धोचे प्रक्षेपण करणाऱ्या वाहिन्या, समालोचक तसेच क्रिडाक्षेत्राशी संबधीत अनेकांचे मोठे नुकसान झाले. हे नुकसान भरून काढायचे असेल तर काही कटू निर्णय घेण्यावाचून कोणताही पर्याय उरलेला नाही. आय पी एल सारख्या आर्थिक दृष्ट्याा अत्यंत महत्वाच्या स्पर्धेच्या आयोजना बाबत अनिश्चिता होती. मात्र आय पी एल चे आयोजन झाले नसते तर बी सी सी आयला तब्बल 4 हजार कोटीचे नुकसान झाले असते.

**निष्कर्ष :–**

कोविड–19 विषाणूचा प्रादूर्भाव भारतीय अर्थ व्यवस्थेतील विविध क्षेत्रावर झालेला आहे. जसे, कृषी क्षेत्र, व्यावसायिक क्षेत्र, लघु उद्योग क्षेत्र, ग्रामीण कामगार, गुतवणूकीचे क्षेत्र, बहुराष्ट्रीय कंपन्या, क्रिडा क्षेत्र, शैक्षणिक क्षेत्र, यावर झालेला असल्याचे दिसून येते. त्यामुळे भारतीय अर्थव्यवस्था बंदीस्त स्वरूपाची असल्याचे जाणवते.

***संदर्भ ग्रंथ सुची :–***

1) *वर्तमानपत्रे (लोकसत्ता, लोकमत, तरूण भारत, महाराष्ट्र टाईम्स,) प्रकाशित झालेले संपादकीय लेख*
2) *भारतीय अर्थव्यवस्थाःलाल अण्ड लाल*
3) *Wikipedia*